**प्रेस नोट        दिनांक ०९/०३/२०१९**

## फरासखाना पोलीस स्टेशन

### वयवृध्द अंध दापंत्यास त्यांची खोली २४ तासाचे आत खाली करुन दिली.

एक वयवृध्द अंध महिला वय ७० वर्षे, रा. ५४३, बुधवार पेठ, पुणे व त्यांचे पती वयवृध्द अंध इसम वय ७५ वर्षे रा. सदर हे दोन्ही अंध व वयस्कर असुन, त्यांनी त्यांची खोली एंजट दिक्षीत मार्फत आगरवाल या व्यक्तीस सुमारे दोन महिन्यांपासुन भाड्याने दिली होती. ते खोलीत राहण्यास आल्यानंतर भाडे देत नव्हते व खोलीही खाली करत नव्हते. घरमालक वयस्कर व अंध असल्याने त्या घरावर कब्जा करण्याच्या प्रयत्नात घर भाडेकरु होता. घरमालक वयवृध्द दापंत्यास दाद देत नव्हता.

वयवृध्द दापंत्य पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी आले. त्यांची तक्रार किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी ऐकुण घेवुन, त्यांनी एजंट दिक्षीत यांना बोलावुन चौकशी करुन, तात्काळ घर खाली करण्याबाबत २४ तासांचा अवधी दिला. त्यानुसार एजंट व आगरवाल यांनी खोली २४ तासाचे आत खाली करुन दिली.

वयवृध्द व अंध दापंत्य यांनी त्यांची खोली ताब्यात मिळाल्यामुळे पोलीसांचे आभार मानले.

(किशोर नावंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे